सांज दैनिक बीड
RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846
# वास्तव
भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित
वाटचाली २१ वर्षं
एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट
● बीड ● मंगळवार, दिनांक २४ मार्च २०२६ ● वर्ष २१ वे ● अंक : ५९ ● पाने : ४ http://epaper.beedvastav.com Email : beedvatsav@gmail.com ● किंमत ३ रुपये

स्क्रीन रिडरचा बादशहा

सच करीब से ही दिखता है...!


# रेल्वे भूसंपादन मावेजा महा घोटाळ्यातील ‘त्या’ एजंटने आता 2 हजार 800 कोटींच्या खुंटेफळ साठवण तलावाकडे वळविला मोर्चा!!

**बस्ताना मांडून खुंटेफळ तलावाचा कोटींनी मावेजा लुटता यावा म्हणून ‘त्या’ एजंटकडून अधिकाऱ्यांवर लाखोंची उधळपट्टी सूरू!!**

**या एजंटच्या सांगण्यावरून अधिकचा मावेजा मिळावा म्हणून दहा वर्षांचे फळझाडे लावण्याचा शेतकऱ्यांकडून सपाटा सुरु!!**

**ज्या पाझर तलावामध्ये नाका तोंडाला येईपर्यंत खाल्ले तशाच पद्धतीने खुंटेफळ साठवण तलाव मावेजा लुटण्यासाठी तो एजंट सरसावला!!**

## खुंटेफळच्या शेतकऱ्यांनो उलट्या काळजाच्या ‘त्या’ एजंटपासून सावध रहा!!



बीड : प्रतिनिधी
कृष्णा मराठवाडा प्रकल्प – उपसा सिंचन योजना क्र. 3 (खुंटेफळ साठवण तलाव) संदर्भात भूसंपादन व पुनर्वसनावर नुकतीच महत्वपूर्ण बैठक आष्टी विधानसभा मतदारसंघाचे अत्यंत लोकप्रिय, कार्यक्षम आणि अभ्यासू आमदार सुरेश आण्णा धस यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात झाली असून याकामाला गती येण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेला 440 व्होल्टेजचा करंट लागल्या प्रमाणे कार्यान्वित झाली आहे. या एकंदरीत प्रक्रियेत आपली डाळ पद्धतशीरपणे शिजवून घेण्यासाठी ‘त्या’ एजंटने संबंधित अधिकाऱ्यांवर लाखोंची उधळपट्टी सुरू केली आहे. विशेष म्हणजे संबंधित एजंटने गावात कोणालाही याची खबरबात लागू नये म्हणून सकाळी सकाळी गाडी घेवून एकटेच या भागातील शेतकऱ्यांशी संपर्क साधून अधिकचा मावेजा कसा मिळवायचा, अधिकाऱ्यांना कसे मॅनेज करायचे, याचे ज्ञान पाजळत फिरत आहेत. दौरा आटोपून घेत आहेत. विशेष म्हणजे या भागातील अनेक शेतकरी त्यांनी आपल्या जाळ्यात ओढले आहेत. या कानाची खबर त्या कानाला लागू नये म्हणून या एजंटने गावातील जे लोक सतत बरोबर असायचे त्यांना पद्धतशीरपणे कट मारून या प्रकल्पात आपल्याला कोट्यावधी रुपये मिळतील असे स्वप्न रंगवून हा एजंट नाकात वारं भरल्याप्रमाणे अधिकाऱ्यांवर लाखो रुपयांची उधळण करीत असल्याची खात्रीलायक माहिती समोर आली आहे.

### असा असेल 2 हजार 800 कोटींचा महत्वाकांक्षी खुंटेफळ साठवण तलाव!!

● बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील दुष्काळी भागासाठी महत्त्वाकांक्षी असलेला खुंटेफळ साठवण तलाव (कृष्ण मराठवाडा उपसा सिंचन योजना क्र.३ अंतर्गत) हे एक महत्त्वाचे जलसिंचन प्रकल्प आहे.

● या तलावामुळे शिंपोरा ते खुंटेफळ दरम्यान ७१ किमी लांब जलवाहिनीद्वारे, तसेच सुमारे ₹२८०० कोटींच्या खर्चातून ३० गावांतील ८० हजार एकर शेती ओलिताखाली येऊन हजारो शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.

● हा प्रकल्प म्हणजे या भागातील विशेषत: या 30 गावातील शेतकऱ्यांचे सुजलाम सुफलाम करणारा आहे.

● या प्रकल्पासाठी या भागाचे लोकप्रिय आमदार सुरेश आण्णा धस यांनी विशेष प्रयत्न करून हा प्रकल्प तडीस घेवून जाण्यासाठी विडा उचलला आहे.

### खुंटेफळ साठवण तलावाची प्रमुख वैशिष्ट्ये

**स्थान :**
● बीड जिल्हा, आष्टी तालुका, महाराष्ट्र

**प्रकल्प :**
● कृष्ण मराठवाडा उपसा सिंचन योजना क्र.३


**उद्दिष्ट :**
● सततच्या दुष्काळी छायेत असलेल्या आष्टी तालुक्यातील गावांसाठी पाण्याचा साठा करणे

**क्षमता व विस्तार :**
● या प्रकल्पांतर्गत शिंपोरा ते खुंटेफळ साठवण तलावापर्यंत बंदिस्त जलवाहिनीचे ७१.३० किलोमीटरचे काम आहे.

**फायदा :**
● सुमारे ३० गावांमधील ८०,००० एकर जमीन ओलिताखाली येणार आहे.

**पुनर्वसन :**
● या प्रकल्पासाठी खुंटेफळ आणि कुंबेफळ गावांचे पुनर्वसन प्रक्रियेत आहे.
● या प्रकल्पाची पाहणी (फेब्रुवारी २०२५) आणि कामे जलसंपदा विभागामार्फत सुरू आहेत

### गोड बोलून, पोटात शिरून, देवांच्या खोट्या शपथा घेऊन शेतकऱ्यांचा काटाच काढणार!!



● सदरील एजंट शेतकऱ्यांचा काटा काढण्यासाठी अत्यंत गोड बोलून, पोटात शिरून विश्वास संपादन करण्यासाठी वेळप्रसंगी देवांच्या खोट्या शपथा खाऊन त्यांना जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न करीत आहे. विशेष म्हणजे त्याने फेकलेल्या जाळ्यात अनेक शेतकरी अडकले असून हे शेतकरी त्याच्या इशाऱ्यावर नाचू लागले आहेत. काही शेतकऱ्यांनी नर्सरीमधून पाच ते दहा वर्षांच्या फळझाडांची मोठ्या प्रमाणात खरेदी करून त्याची लागवड आपल्या शेतात करीत आहेत, अशीही खात्रीलायक माहिती समजते. दरम्यान या भागातील शेतकऱ्यांनी सदरील एजंटवर डोळे झाकून विश्वास न ठेवता डोळे उघडे ठेवून मावेजाची प्रक्रिया पूर्ण करावी अन्यथा एजंट आणि शासकीय अधिकारी, कर्मचारी कोट्यावधी रुपये खाऊन तोंडाला हात पासून ढेकर न देता निघून जातील. मात्र, शेतकऱ्यांच्या जमिनीवर भविष्यात कोटी रुपयांचा शासनाचा बोजा पडल्याशिवाय राहणार नाही. कारण आता परिस्थिती पूर्वीसारखी राहिलेली नाही. ऑनलाईन प्रक्रियेमध्ये विशेषता सॅटलाईट द्वारे तुमच्या शेतामध्ये दहा वर्षांपूर्वी काय होते आणि काही नाही हे स्पष्ट दिसते. त्यामुळे आत्ताच शेतकऱ्यांनी सावध पवित्रा घ्यावा, असे आवाहन केले जात आहे.

### 2 हजार 800 कोटींचा प्रकल्प असल्याने एजंटकडून अधिकाऱ्यांवर लाखोंची उधळपट्टी!

● सदरील एजंटने रेल्वे भूसंपादन मावेजामध्ये कोट्यावधी रुपयांचा घोटाळा केल्याची बाब चर्चेत असून याचा भांडाफोड लवकरच होणार आहे. तत्पूर्वी खुंटेफळ साठवण तलाव प्रकल्पात शासनाचे कोट्यवधी रुपये लुटण्यासाठी सदर एजंटने चांगले जाळे फेकले असून या जाळ्यात शेतकरी, अधिकारी आणि कर्मचारी चांगलेच अडकणार असल्याचे दिसून येत आहे. सध्या काही महत्त्वाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना खुश करण्यासाठी त्यांच्यावर लाखो रुपयांची उधळपट्टी सदरील एजंटकडून केली जात आहे.

● फक्त अधिकाऱ्यांनी किंवा कर्मचाऱ्यांनी तोंडातून शब्द काढावा तो शब्द खाली पडू दिला जात नाही, याची पूर्णपणे खबरदारी सदरील एजंट घेत आहे. शासनाला लुटण्याच्या नादात हा एजंट सिंहाच्या जबड्यात हात घालत आहे, हे कदाचित हा एजंट विसरला असावा असे वाटते. कारण हा विधानसभा मतदारसंघ लेच्यापेच्या आमदाराचा नाही, हि बाब डोळ्यावर धुंदी आलेल्या एजंटच्या लक्षात आली नसावा, असेही बोलले जात आहे.

## 26 रोजी नाकलगांव येथे अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

**➤ 42 वर्षांची परंपरा ➤ नारायण बाबा देवस्थान संस्थान, वांगीचे अध्यक्ष एकनाथ महाराज माने यांचे काल्याच्या कीर्तन**

➤ बीड : प्रतिनिधी
दि. 26 मार्च रोजी नाकलगांव येथे सुरु असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तिमय वातावरणात सांगता होणार आहे. गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर 19 मार्च रोजी या सप्ताहाची सुरुवात करण्यात आली होती. गेल्या आठवडाभरापासून संपूर्ण गाव हरिनामाच्या गजरात न्हाऊन निघाले असून, वारकरी संप्रदायाची परंपरा जपत गावकऱ्यांनी एक आदर्श उभा केला आहे.


या सप्ताहात दररोज महाराष्ट्रातील नामांकित किर्तनकारांची कीर्तनसेवा आयोजित करण्यात आली आहे. विविध भागांतून आलेल्या हरिभक्तांनी कीर्तन, भजन, अभंग आणि नामस्मरण यात सहभागी होत अध्यात्मिक उन्नतीचा अनुभव घेतला. गावातील प्रत्येक घरातून “विठ्ठल विठ्ठल”चा नाद ऐकू येत असून, भक्तीभावाने भारलेले वातावरण निर्माण झाले आहे.

नाकलगांव हे वारकरी परंपरेचे जतन करणारे गाव म्हणून ओळखले जाते. तब्बल 42 वर्षांपासून अखंड हरिनाम सप्ताहाची परंपरा गावाने अखंडपणे जपली आहे. ही परंपरा केवळ धार्मिक कार्यक्रमापुरती मर्यादित नसून समाजात एकोपा, सद्भावना आणि सेवा भावना निर्माण करणारी आहे. “यारे यारे लहान थोर भलत्या याती नारी नर” या संत विचारातील समतेची प्रचिती या सप्ताहात अनुभवायला मिळते. वारकरी संप्रदाय हा संतांच्या शिकवणीवर आधारित असून, त्यातून साधेपणा, प्रामाणिकपणा आणि परोपकार यांचा संदेश दिला जातो. या सप्ताहाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे अन्नदान. दररोज गावातील एक अन्नदाता भक्तांना महाप्रसाद देण्याची सेवा करीत आहे. “अन्नदान हेच श्रेष्ठ दान” या भावनेतून गावकऱ्यांनी ही परंपरा जिवंत ठेवली आहे. त्यामुळे केवळ धार्मिकच नव्हे तर सामाजिक एकात्मतेचाही संदेश या उपक्रमातून दिला जात आहे. या सप्ताहाची सांगता नारायण बाबा देवस्थान संस्थान, वांगीचे अध्यक्ष श्री. ह. भ. प. एकनाथ महाराज माने यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार आहे. त्यांच्या कीर्तनातून वारकरी संप्रदायाचा गाभा, संतविचार आणि नामस्मरणाचे महत्त्व प्रभावीपणे मांडले जाणार आहे. त्यामुळे सांगता सोहळा अधिकच भक्तिमय आणि प्रेरणादायी ठरणार आहे.

वारकरी संप्रदाय हा केवळ धार्मिक प्रवाह नसून तो जीवन जगण्याची एक सुसंस्कृत पद्धत आहे. संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या विचारांनी प्रेरित हा संप्रदाय समाजात समता, बंधुता आणि प्रेमाचा संदेश देतो. नाकलगांव येथील हा सप्ताह त्याच मूल्यांचे जतन करत पुढील पिढीपर्यंत ● पान ४ वर...

## ‘विनय इण्डेन’ गॅस एजन्सीला पुरवठा विभागाचेच अभय; ग्राहकांचा छळ सुरूच

**➤ फोन बंद करून व गॅस बुकींग करत नसल्याने सरकारची बदनामी; पुरवठा विभागाचे अधिकाऱ्यांनी ऑफसला भेट दिल्याने फोन बंद केल्याचे सांगितले**




➤ छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी
देशभरात गेल्या काही दिवसांपासून गॅस सिलेंडरची तीव्र टंचाई निर्माण झाली असून, या परिस्थितीत नागरिकांना दुहेरी फटका बसत असल्याचे चित्र आहे. एकीकडे सिलेंडरसाठी ग्राहकांना दिवसन्‌दिवस एजन्सीच्या फेऱ्या माराव्या लागत आहेत, तर दुसरीकडे सीडको, बळीराम पाटील शाळेजवळ असलेल्या इण्डेन गॅस एजन्सीने ऑफिसची सर्व फोन सेवा बंद करून ग्राहकांचे टेन्शन वाढवले. फोन करून करून थकल्यानंतर नागरिक दुकानावर चकरा मारत आहेत. येथील काहीजण अशा नागरिकांना बाजूला घेऊन जादा दरात गॅस सिलिंडर विक्री करत अल्याच्या तक्रारी आहेत. केवळ याच कारणामुळे गॅस एजन्सीने आपले फोन व मोबाईल नंबर बंद करून ठेवली आहेत. काही जणांना १३ तारखेला बुकींग करून त्यांची ऐनवेळी बुकींग केली नसल्याचे सांगत आहेत. काहींना गॅस बुकींग केल्याचा मॅसेज येऊनही त्यांना दहा दिवस गॅस मिळत नाही आणि नेमके गॅस कधी येणार आहे हे विचारण्यासाठीऑफिसला फोन केल्यानंतर ऑफिसने सर्व नंबर व मोबाईल नंबर बंद करून ठेवली आहेत. वारंवार मोबाईल करून चौकशी करणाऱ्या ग्राहकांचे नंबर ब्लॉक करण्यात आले आहेत. नागरिकांनी या एजन्सीला मेल टाकून तक्रार केल्यानंतर मेल चे एकदा उत्तर दिल्यानंतर पुन्हा गॅस दिला जात नाही अशा तक्रारी असून तात्काळ या एजन्सीवर कार्यवाही करण्याची मागणी ग्राहकांकडून होत आहे. हे ऑफिस एजन्सी मालकाने ऑफिस बॉय व कर्मचाऱ्यांच्या भरवशावर सोडल्याने ग्राहकांत संभ्रम निर्माण होत आहे.

### गॅसचा प्रचंड तुटवडा असल्याचे चित्र इण्डेन ने निर्माण केले

#### पुरवठा विभागाचे नियंत्रण नाही

● प्रचंड गॅस टंचाई अल्याचे भासवून गॅस चा काळाबाजार केल्याच्या तक्रारी असूनही पुरवठा विभागाकडून गॅस एजन्सीच्या मनमानीला चाप लावला जात नाही. लोकांच्या तक्रारींकडे विभागाचे सपशेल दुर्लक्ष केले जात आहे. ग्राहकांना बुकींग करूनही गॅस दिला जात नाही. त्यांचे फोन उचलले जात नसल्याने त्यांना समाधानकारक उत्तर मिळत नाही.

## मौजे तांदळवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह व भागवत कथेचे पारायण



➤ किल्ले धारूर : प्रतिनिधी
धारूर तालुक्यातील तांदळवाडी येथे 19/03/2026 रोजी अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात झाली असून गेल्या 26 वर्षापासून अखंड हरिनाम सप्ताह भागवत पारायण यांची परंपरा अखंड चालू आहे ही अखंड पारायण सेवा चालूच राहणार असून धारूर तालुक्यातील तांदळवाडी येथे ज्ञानेश्वरी पारायण काकड आरती भजन कीर्तन सप्ताहात चालू असून तालुक्यातील भाविक भक्तांनी या कथेचा व कीर्तनाचा लाभ घ्यावा या सप्ताहाची सांगता गुरुवार रोजी होणार असून तालुक्यातील भाविक भक्तांनी या सप्ताहाचा लाभ घ्यावा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे समस्त गावकरी मंडळी तांदळवाडी यांच्या वतीने करण्यात आले असून भागवताचार्य ह भ प ज्ञानेश्वरी सोळुंके यांची असून तबलावादक माऊली महाराज राजूरकर संत वादक गोविंद महाराज पार्टी पॅड वादक गणेश सुरनरकर यांच्या गोड वाणीतून मोजे चांदवाडी परी गावातील व परिसरातील भाविक भक्त मंत्रमुग्ध झाले आहेत या सप्ताहात महाप्रसादाचा लाभ गुरुवार रोजी व सांगता होईल अशी आव्हान गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## आजचे राशि भविष्य

### मेष रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्‌भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

### वृषभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

### मिथुन रास

➤ या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्‌भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

### कर्क रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

### सिंह रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### कन्या रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

### तूळ रास

➤ आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

### वृश्चिक रास

➤ आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

### धनु रास

➤ आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वत:च्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### मकर रास

➤ या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.


### कुंभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

### मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.

# सामान्य जनतेच्या विश्वासाचा आधारवड कोसळला : दत्ता मेघे युगाचा अंत



विशेष

प्रवीण बागडे
नागपूर मो.क्र.९९२३६२०९१९

विदर्भाच्या राजकीय, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात अढळ ठसा उमटवणारे ज्येष्ठ नेते दत्ता मेघे यांच्या निधनाची बातमी ही केवळ एका व्यक्तीच्या जाण्याची घटना नाही; ती एका युगाच्या अस्ताची वेदनादायी जाणीव करून देणारी आहे. सार्वजनिक जीवनात सातत्याने सक्रिय राहून लोकसभा, राज्यसभा आणि विधान परिषद अशा विविध सभागृहांतून जनतेचा आवाज बुलंद करणाऱ्या या दिग्गज व्यक्तिमत्त्वाच्या जाण्याने विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्राने एक अनुभवी, दूरदृष्टीचा आणि समाजाशी नाळ जपणारा नेता गमावला आहे. दत्ता मेघे यांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी होते. संसदीय व्यासपीठावर त्यांनी केवळ प्रश्न उपस्थित केले नाहीत, तर त्या प्रश्नांच्या मुळाशी जाऊन शासनव्यवस्थेला दिशा देण्याचे काम केले. त्यांच्या राजकीय प्रवासाकडे पाहिले, तर तो सत्तेच्या मोहाचा नव्हे, तर समाजकारणाशी नाळ जोडणाऱ्या आणि विकासाला केंद्रस्थानी ठेवणाऱ्या नेतृत्वाचा प्रवास होता.

विकासाच्या असमतोलाने दीर्घकाळ त्रस्त असलेल्या विदर्भासाठी दत्ता मेघे हे केवळ राजकारणी नव्हते, तर ते एक ठाम आवाज होते. शेतीचे प्रश्न, उद्योगधंद्यांची कमतरता, बेरोजगारी आणि पायाभूत सुविधांची उणीव, या सगळ्या समस्यांकडे त्यांनी केवळ आकडेवारी म्हणून पाहिले नाही, तर त्या मागील मानवी वेदना समजून घेतल्या. म्हणूनच त्यांच्या भूमिकेत केवळ राजकीय आक्रमकता नव्हती, तर सामाजिक संवेदनशीलताही होती.

राजकारणात त्यांनी सत्तेच्या गणितांपेक्षा विकासाच्या समीकरणांना प्राधान्य दिले. पक्षीय समीकरणांच्या गुंतागुंतीतही त्यांनी आपली स्वतंत्र ओळख जपली. त्यांची शैली आक्रमक असली, तरी ती केवळ विरोधासाठी नव्हती; ती रचनात्मक टीका आणि पर्यायी विचार मांडण्यासाठी होती. शासनाच्या धोरणांवर टीका करताना त्यांनी ठोस उपायही सुचवले, हे त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य ठरते. दत्ता मेघे यांच्या कार्याचा सर्वात भक्कम पाया म्हणजे शिक्षण क्षेत्रातील त्यांचे योगदान. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, त्यांच्या स्वप्नांना दिशा मिळावी आणि ते आत्मनिर्भर बनावेत, यासाठी त्यांनी उभारलेल्या शैक्षणिक संस्थांनी हजारो कुटुंबांचे आयुष्य बदलले. शिक्षण हे केवळ रोजगाराचे साधन नसून समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे, या विश्वासातून त्यांनी उभे केलेले कार्य आजही प्रेरणादायी आहे.

आज शिक्षणाचे वाढते व्यापारीकरण चिंताजनक ठरत असताना, दत्ता मेघे यांनी शिक्षणाला सामाजिक बांधिलकीची जोड दिली. त्यांच्या संस्थांमधून घडणारे विद्यार्थी केवळ पदवीधर नाहीत, तर ते समाजाभिमुख नागरिक असतात, हीच त्यांच्या कार्याची खरी पावती आहे. सामाजिक क्षेत्रातही त्यांचे योगदान तितकेच मोलाचे होते. वंचित आणि दुर्बल घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. समाजातील विषमता कमी व्हावी, संधींचे समान वितरण व्हावे, यासाठी त्यांनी कृतीशील भूमिका घेतली. त्यांच्या कार्यात घोषणाबाजीपेक्षा कृतीला अधिक महत्त्व होते आणि हीच बाब त्यांना इतरांपेक्षा वेगळे ठरवते. आजच्या राजकारणात तात्कालिक फायद्यासाठी भूमिका बदलणारे, समाजाशी तुटलेले आणि केवळ सत्तेसाठी धडपडणारे नेतृत्व वाढताना दिसते. अशा काळात दत्ता मेघे यांसारख्या मूल्यनिष्ठ नेत्यांची उणीव अधिक प्रकर्षाने जाणवते. त्यांनी आपल्या राजकीय आयुष्यातील चढ-उतार स्वीकारले, पराभव पचवले; पण जनतेशी असलेली नाळ कधीही तुटू दिली नाही. हेच त्यांच्या नेतृत्वाचे खरे बळ होते. त्यांच्या निधनाने एक मूलभूत प्रश्न समोर येतो की, आजच्या राजकारणात अशा प्रकारचे नेतृत्व घडवले जात आहे का? समाजाशी जोडलेले, विकासाला प्राधान्य देणारे आणि दीर्घकालीन दृष्टी असलेले नेते निर्माण होणे ही काळाची गरज आहे. निवडणुका जिंकणे हेच नेतृत्वाचे अंतिम मापदंड नसून, समाजावर सकारात्मक आणि दीर्घकालीन परिणाम घडवणे हेच खरे नेतृत्व आहे, हे दत्ता मेघे यांच्या कार्यातून अधोरेखित होते.

त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी सहज भरून निघणारी नाही. मात्र, त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेणे हीच खरी जबाबदारी आहे. त्यांच्या विचारांना, कार्यपद्धतीला आणि सामाजिक बांधिलकीला अनुसरून काम केले, तरच त्यांच्या स्मृतीला खरी आदरांजली ठरेल. आज अनेकजण त्यांना शब्दांत श्रद्धांजली अर्पण करत आहेत; परंतु खरी श्रद्धांजली ही कृतीतूनच व्यक्त होते. समाजासाठी काम करण्याची जिद्द, शिक्षणाला दिलेले प्राधान्य आणि विकासासाठी घेतलेली ठाम भूमिका, या मूल्यांचा स्वीकार केला, तरच त्यांच्या कार्याला खरी सलामी दिली जाईल.

दत्ता मेघे यांचे आयुष्य हे संघर्ष, समर्पण आणि समाजसेवेचा जिवंत आदर्श आहे. त्यांनी ज्या मूल्यांसाठी आयुष्य झोकून दिले, ती मूल्ये आजही तितकीच महत्त्वाची आहेत. व्यक्ती निघून जातात, पण त्यांचे विचार आणि कार्य अमर राहतात, दत्ता मेघे हे त्यापैकीच एक. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

भावपूर्ण श्रद्धांजली.

# गावकुसाबाहेरून सत्तेच्या केंद्रात : हरकी निमगावच्या पोलीस पाटीलपदी राम कटारे

➤ **माजलगाव / प्रतिनिधी :** जिल्ह्यात सध्या पोलीस पाटील पदाच्या भरती प्रक्रियेला वेग आला असून, अनेक उच्चशिक्षित तरुण या पदासाठी स्पर्धेत उतरले आहेत. अशाच स्पर्धेत हरकी निमगाव (ता. माजलगाव) येथील राम कटारे यांनी उल्लेखनीय यश मिळवत पोलीस पाटील पदावर आपली निवड निश्चित केली आहे. राम कटारे यांनी नुकत्याच पार पडलेल्या परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवत हे यश संपादन केले. त्यांच्या या निवडीमुळे गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

विशेष म्हणजे, सामाजिकदृष्ट्या वंचित समजल्या गेलेल्या बहुजन समाजातील तरुणाने हे पद मिळवणे ही केवळ वैयक्तिक यशकथा नसून सामाजिक समतेच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. शिक्षण आणि संविधानिक हक्कांच्या बळावर ग्रामीण भागात नेतृत्वाची नवी दारे खुली होत असल्याचे या निवडीतून दिसून येते. राम कटारे यांच्या यशाबद्दल गावातील ग्रामस्थ, मित्रपरिवार व विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या पुढील कारकिर्दीसाठी सर्वांकडून शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.



**महत्वाचे ठळक मुद्दे**

- हरकी निमगाव येथे पोलीस पाटीलपदी राम कटारे यांची निवड
- स्पर्धात्मक परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवत यश
- बहुजन समाजातील तरुणाने गाठले नेतृत्वस्थान
- सामाजिक समतेच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल
- ग्रामस्थ व मित्रपरिवाराकडून अभिनंदनाचा वर्षाव

# पशुपालकांसाठी सुवर्णसंधी : 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना'तून मोठे अनुदान

माजलगाव / प्रतिनिधी : महाराष्ट्र शासनाच्या कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागामार्फत राबविण्यात येणारी 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' ही राज्यातील शेतकरी व पशुपालकांसाठी मोठी संधी ठरत आहे. पशुपालकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, ग्रामीण भागातील रोजगारनिर्मिती वाढवणे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यास हातभार लावणे हा या योजनेचा मुख्य उद्देश असल्याची माहिती पशुसंवर्धन अधिकारी डॉ. रणजित शेजुळ यांनी दिली.



डॉ. शेजुळ यांनी सांगितले की, या योजनेअंतर्गत दुग्ध व्यवसायासाठी ५ दुधाळ गायी किंवा म्हशींचे वाटप केले जाते. यासोबतच ३ वर्षांचा विमा, शेड बांधकाम, कडबाकुट्टी यंत्र व मिल्किंग मशीन यांसारखी आवश्यक

## गरजूंनी योजनेचा लाभ घ्यावा - डॉ. रणजित शेजुळ

साधनसामुग्री उपलब्ध करून दिली जाते. वैरण विकासासाठी मुरघास संयंत्र, हार्वेस्टर व बेलर यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचाही समावेश करण्यात आला आहे.

शेळी व मेंढीपालनासाठी ५० माद्या व ५ नरांचा गट, ३ वर्षांचा विमा, शेड आणि ३ केव्ही सोलर सुविधा देण्यात येते. कुक्कुटपालनासाठी किमान ५००० पक्ष्यांच्या प्रकल्पांना शेड, खाद्य-पाणी व्यवस्था आणि ऑटोमेशन सुविधा पुरवून प्रोत्साहन दिले जाते.

या योजनेत सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थ्यांना ५० टक्के, तर अनुसूचित जाती-जमातींतील लाभार्थ्यांना ७५ टक्क्यांपर्यंत अनुदान दिले जाते. याशिवाय पशुपालनासाठी घेतलेल्या कर्जाची वेळेत परतफेड केल्यास ४ टक्के व्याज सवलतीचाही लाभ मिळतो.

योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार अल्पभूधारक, अत्यल्प भूधारक किंवा महिला बचत गटातील असणे आवश्यक आहे. अर्जदाराकडे स्वत:ची जमीन किंवा नोंदणीकृत भाडेपट्टा असावा, तसेच प्रशिक्षण प्रमाणपत्र किंवा २ ते ४ वर्षांचा अनुभव आवश्यक आहे. अर्ज करताना ७/१२ उतारा, आधार कार्ड, बँक पासबुक, प्रशिक्षण/अनुभव प्रमाणपत्र तसेच दिव्यांगांसाठी UDID प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

अधिक माहितीसाठी संबंधित तालुक्यातील पशुसंवर्धन अधिकारी किंवा जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन डॉ. रणजित शेजुळ यांनी केले आहे.

**महत्वाचे ठळक मुद्दे**

- पशुपालक व शेतकऱ्यांसाठी शासनाची महत्त्वाकांक्षी योजना
- दुग्ध, शेळी-मेंढी व कुक्कुटपालनासाठी आर्थिक मदत
- सर्वसाधारण प्रवर्गासाठी ५०% तर SC/ST साठी ७५% अनुदान
- ३ वर्षांचा विमा, शेड व आधुनिक यंत्रसामग्रीचा समावेश
- कर्जाची वेळेत परतफेड केल्यास ४% व्याज सवलत
- अर्जासाठी जमीन, अनुभव/प्रशिक्षण व आवश्यक कागदपत्रे बंधनकारक

# भोंदूबाबा अशोक खरातला 29 मार्चपर्यंत पोलीस कोठडी; नरबळी दिल्याचा संशय, कोर्टात काय घडलं?

**नाशिक :** गेले काही दिवस राज्यात भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणावरून राज्याचे राजकारण चांगलेच तापले आहे. अशामध्ये, त्यांच्याविरोधात एकूण 6 गुन्हे दाखल झाले आहेत. नव्याने दाखल झालेल्या तीन तक्रारींमध्ये विद्यार्थिनींचाही समावेश असल्याने हे प्रकरण चांगलेच तापले आहे. अशामध्ये, त्याला 24 मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. गेले काही दिवस एसआयटीकडून त्याची कसून चौकशी करण्यात आली. कोठडीची मुदत संपत असताना अशोक खरातला मंगळवारी (24 मार्च) नाशिक सत्र न्यायालयात हजर करण्यात आले. अशामध्ये नाशिक सत्र न्यायालयाने त्याला 5 दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. त्यामुळे आता 29 मार्चपर्यंत तो पोलिसांच्याच ताब्यात असणार असून आता पुढील चौकशीमध्ये काय समोर येते? हे पाहणे आता महत्त्वाचे ठरणार आहे.

कोर्टात नेमकं काय घडलं?

भोंदूबाबा अशोक खरातला तोंडावर काळा कपडा टाकून नाशिक सत्र न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी सरकारी वकील शैलेंद्र बागडे यांनी सांगितले की, अशोक खरातविरोधात गंभीर स्वरूपाचे आरोप आहेत. त्याच्या तपासासाठी आणखी वेळ हवा आहे. खासकरून, लैंगिक अत्याचाराशी संबंधित प्रकरणांमध्ये डिजिटल पुरावे गोळा करण्याचे काम अद्याप सुरू आहे. त्यामुळे पोलिसांना आणखी 7 दिवसांची पोलीस कोठडी देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी यावेळी केली आहे. यावेळी वकिलांनी सांगितले की, तपासादरम्यान पोलिसांनी आरोपीकडून एक पिस्तूल जप्त केले आहे. या पिस्तूलाचा वापर करून 5 नरबळी दिल्याचा संशय पोलिसांना आहे. त्यासंदर्भातील काही प्राथमिक पुरावेही पोलिसांच्या हाती लागले आहेत. तसेच, आरोपीकडे काही मालमत्तेची कागदपत्रेही सापडली आहेत. त्याद्वारे अनेक लोकांची फसवणूक केल्याचा संशय असून आणखी तपासासाठी त्यांची चौकशी करायची असल्याचे सांगितले. अशोक खरातवर वन्यजीव शिकार प्रकरणाचाही संशय व्यक्त केला जात आहे. त्याने हरणाची शिकार करून 'कस्तुरी' नावाने काही पदार्थ लोकांना दिला आहे. या सर्व आरोपांची सखोल चौकशी सुरू आहे. अशोक खरात हा भक्तांना साप, वाघ दाखवायचा अशी माहितीही तपासामध्ये समोर आली. पोलीस कोठडीची मागणी करताना सरकारी वकिलांनी याचा उल्लेख केला. अशोक खरातने बोटात घालायचे खडे कुठून आणले? मिश्रित पाणी कुठून आणले? याचा तपास करायचा आहे. त्याच्याकडे 5 जिवंत काडतुसेही सापडले आहेत, अशी माहिती सरकारी वकिलांनी न्यायालयाला दिली आहे.



सांज दैनिक बीड वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक - जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक -अरविंद ओव्हाळ** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद-विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922



## पी.एम. श्री हायस्कूल, वाई बाजार येथे १० वी सज्जता उन्हाळी शिबिराचे उद्घाटन

**➤ माहूर / प्रतिनिधी :**
वाई बाजार येथील जिल्हा परिषद पी .एम . श्री हायस्कूलमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६ –२७ च्या इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेकरिता आयोजित २५ दिवसीय ' विशेष उन्हाळी मार्गदर्शन नव उपक्रम शिबिराचा ' आयोजन शाळेच्या वतीने मुख्याध्यापक अजय राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली उद्घाटन सोहळा २३ मार्च रोजी शाळेतील शिक्षक वृंद विद्यार्थी व पालक यांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला . ' दहावी म्हणजे भीती नाही, तर प्रगतीची पहिली पायरी ' या ब्रीदवाक्यासह या शैक्षणिक उपक्रमाचा श्रीगणेशा करण्यात आला .
कार्यक्रमाचे उद्घाटन व अध्यक्षपद शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमजद खान हैदर खान पठाण यांनी भूषविले . यावेळी त्यांनी शाळेच्या या अभिनव उपक्रमाचे कौतुक करत पालकांनी आपल्या पाल्यांच्या प्रगतीसाठी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले . शाळेचे मुख्याध्यापक व प्रमुख मार्गदर्शक अजय राठोड यांनी आपल्या मार्गदर्शनात दहावीच्या वर्षाचे महत्त्व आणि अभ्यासाचे अचूक नियोजन यावर विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले .

कार्यक्रमाची सुरुवात श्रीमती गोल्हर मॅडम यांनी केलेल्या प्रभावी प्रास्ताविकाने झाली . त्यांनी शिबिराचा हेतू स्पष्ट केला . त्यानंतर थोरात सर व धडीले सर यांनी आपले मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले . संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सारंग साळुंके सर यांनी आपल्या ओघवत्या शैलीत केले .हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इयत्ता १० वीच्या वर्गशिक्षिका चौधरी मॅडम व वाळके सर व शाळेतील सर्व शिक्षकांनी,विशेष परिश्रम घेतले . याप्रसंगी मोठ्या संख्येने विद्यार्थी व पालक उपस्थित होते .

## कृषिचे तंत्रज्ञान शेतक-यांपर्यंत पोहोचवण्यासाठी रासेयो स्वयंसेवकांनी कटीबद्ध असावे

● पान ४ वरून . . .
मठाचे विश्वस्त श्री . सुंदरराव माने व श्री . भास्कर कुलकर्णी हे मान्यवर उपस्थित होते .

मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व वसंतराव नाईक यांचे प्रतिमापूजन झाले . त्यानंतर स्वागतगीत गायनाने कार्यक्रमास सुरुवात झाली . अध्यक्षीय समारोपात डॉ .बाबासाहेब ठोंबरे म्हणाले की, खऱ्या शिक्षणाचे ध्येय केवळ पदवी मिळवणे नसून, त्या ज्ञानाचा वापर समाजाच्या आणि विशेषत : ग्रामीण भागाच्या प्रगतीसाठी करणे हे आहे . कृषि विद्यार्थ्यांनी प्रयोगशाळेतील तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या बांधावर नेणे ही त्यांची नैतिक जबाबदारी आहे . पारंपरिक शेतीला आता आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणे अनिवार्य आहे . बदलत्या हवामानानुसार पिकांचे नियोजन, सुधारित बियाण्यांचा वापर आणि संरक्षित सिंचन यावर भर दिला पाहिजे ' गावचा विकास म्हणजेच देशाचा विकास ' असे त्यांनी प्रतिपादन केले . डॉ .भिकाने यांनी पदवी मिळवणे हा केवळ एक टप्पा आहे, परंतु महाविद्यालयात शिकलेले तांत्रिक ज्ञान सोप्या भाषेत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे आणि ते त्यांच्या बांधावर राबवणे हेच खरे यश असल्याचे म्हटले . ग्रामीण भागातील पशुधनाचे आरोग्य सुधारल्यास शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारेल . पशुपालन हा केवळ जोडधंदा नसून तो एक शास्त्रशुद्ध व्यवसाय आहे . श्री . शरद झरे म्हणाले विद्यार्थ्यांच्या श्रमातून आणि ग्रामस्थांच्या सहकार्यातून हे शिबिर खऱ्या अर्थाने यशस्वी झाले . हे शिबिर हे केवळ श्रमदानाचे माध्यम नसून ते विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाचे केंद्र आहे . इथे विद्यार्थी एकमेकांशी जुळवून घेणे, नेतृत्व करणे आणि सामाजिक जबाबदारी निभावणे शिकतात .

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कु .आदिती आचार्य, प्रास्ताविक व आभार राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ .अनिलकुमार कांबळे यांनी मानले .डॉ .दयानंद मोरे, डॉ .प्रभाकर आडसूळ, डॉ .ज्ञानेश्वर सुरडकर, दशरथ सुरवसे, सुधाकर स्वामी, उत्तम पवार, दीपक जाधव, यांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वी झाला . शेतकरी, ग्रामस्थ यावेळी बहुसंख्येने उपस्थित होते . विद्यार्थी – विद्यार्थिनी हे मात्र जड अंतकरणाने सर्वांचा निरोप व ज्ञानाची शिदोरी घेवून महाविद्यालयात परतले .

# महाराष्ट्र केसरीत सुमितकुमार भारस्कर विजेता; ज्युनिअर महाराष्ट्र केसरीचा मान बीडकडे








**➤ अरविंद ओव्हाळ :प्रतिनिधी**
तालुक्यातील शेलापुरी या पुनर्वसित गावातील ऊसतोड कामगाराचा मुलगा पै . सुमितकुमार आप्पासाहेब भारस्कर याने महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत ७० किलो वजन गटातील गादी विभागात सुवर्ण पदक पटकावत विजेतेपद पटकावले आहे . या यशामुळे ज्युनिअर महाराष्ट्र केसरीचा मान बीड जिल्ह्याला मिळाला आहे .

ही स्पर्धा महाराष्ट्र केसरी अधिवेशन 2026 अंतर्गत १८ ते २२ मार्च २०२६ दरम्यान वाघोली ( पुणे ) येथे पार पडली . स्पर्धेदरम्यान सुमितकुमारने पहिल्या चार फेऱ्यांमध्ये प्रतिस्पर्ध्यांवर १०–० अशा मोठ्या फरकाने विजय मिळवला . उपांत्य फेरीत पुणे शहराच्या विपुल थोरात याच्यावर ८–५ अशी मात करत अंतिम फेरीत प्रवेश केला . अंतिम सामन्यात कोल्हापूरच्या सत्तपा हिरगुडे याच्यावर ६–० असा एकतर्फी विजय मिळवत त्याने सुवर्ण पदकावर शिक्कामोर्तब केले .

सध्या सुमितकुमार पुण्यातील मारुंजी येथे अमोल बुचडे कुस्ती अकादमीमध्ये प्रशिक्षण घेत असून, त्याला रुस्तम–ए–हिंद तथा महाराष्ट्र केसरी पै . अमोल भाऊ बुचडे यांच्यासह विविध प्रशिक्षकांचे मार्गदर्शन लाभत आहे .

या उल्लेखनीय यशामुळे माजलगावसह संपूर्ण बीड जिल्ह्याचा दबदबा महाराष्ट्र केसरी स्पर्धेत अधोरेखित झाला असून, सुमितकुमार भारस्कर याच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे .

**मुख्य मुद्दे :**
- बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यातील शेलापुरी गावच्या खेळाडूची सुवर्ण कामगिरी
- ७० किलो गटात गादी विभागात प्रथम क्रमांक
- अंतिम फेरीत एकतर्फी विजय
- ऊसतोड कामगाराच्या मुलाने गाठले यश
- पुण्यात प्रशिक्षण घेऊन घडवली कामगिरी

# १३ कोटींचा निधी... आणि रस्त्यावर फक्त डागडुजी! प्रशासनाचा कारभार पुन्हा संशयाच्या भोवऱ्यात

### पावसाळ्यापूर्वी संपूर्ण रस्त्याचे दर्जेदार डांबरीकरण अपेक्षित मात्र वरवरची कामे करून कोट्यवधींचा निधी खर्च केल्याचा संशय



उघडा डोळे बघा नीट



**➤ वडवणी : अशोक फपाळ**
वडवणी–चिंचवन या महत्त्वाच्या रस्त्यासाठी तब्बल १३ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्याची घोषणा झाली पण प्रत्यक्षात नागरिकांच्या वाट्याला काय ? — फक्त तात्पुरती डागडुजी ! रस्त्याची अवस्था इतकी बिकट झाली आहे की ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे जीवघेणे ठरत आहेत . सध्या सुरू असलेले काम हे केवळ खड्डे बुजवण्यापुरते मर्यादित असून, काही दिवसांतच पुन्हा रस्ता उखडणार हे स्पष्ट दिसत आहे . यामुळे वाहनधारकांचा संताप अनावर झाला आहे .


स्थानिक नागरिकांचा थेट आरोप आहे — पावसाळ्यापूर्वी संपूर्ण रस्त्याचे दर्जेदार डांबरीकरण अपेक्षित होते, मात्र वरवरची कामे करून कोट्यवधींचा निधी खर्च केल्याचा संशय निर्माण झाला आहे . या निष्काळजीपणामुळे अपघातांची भीती वाढली असून रोजचा प्रवास धोकादायक बनला आहे .

**नागरिकांची ठाम मागणी:**
- संपूर्ण रस्त्याचे नव्याने व दर्जेदार बांधकाम करावे
- मंजूर निधीचा हिशोब पारदर्शकपणे जाहीर करावा
- दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी

एकीकडे कोट्यवधींची घोषणा, तर दुसरीकडे रस्त्यांची दयनीय अवस्था

● — या विसंगतीमुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे . आता तरी जबाबदार यंत्रणा जागी होणार का, असा सवाल नागरिक विचारत आहेत .
ही फक्त डागडुजी नाही, तर जनतेच्या विश्वासाचीही पडझड आहे !

## महा जम्बो शब्दकोडे



**आडवी विधाने**
१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दु:ख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

**उभी विधाने**
१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंत:करण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - ** अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंत:करण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

**महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर**

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | ■ | धु | ■ | टो | क | दा | र |
| सा | ग | र | ■ | म | ■ | स | ई | प | रां | ज | पे | ■ | दा | स |
| ■ | न | ■ | द | ■ | वा | र | स | ■ | डे | रा | ■ | लू | ■ | वं |
| अ | म | री | श | पु | री | ■ | ■ | म | ■ | सं | क | ट | ■ | ती |
| ना | त | ■ | र | त | ■ | चौ | क | शी | ■ | ध | ■ | मा | घ | ■ |
| थ | ■ | र | थ | ■ | मा | का | ■ | द | र | ■ | खा | र | ■ | क |
| ■ | मो | द | ■ | क | ल | र | व | ■ | वा | ट | प | ■ | त | म |
| मे | ह | न | त | ■ | व | ■ | जी | व | न | ■ | र | ख | वा | ला |
| ह | र | ■ | ■ | क | ण | ख | र | ■ | गी | त | ■ | रू | ■ | ■ |
| बू | ■ | स | व | ड | ■ | प | ■ | उ | ■ | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | ■ | रा | ■ | उ | दा | ह | र | ण | ■ | श | र |
| ■ | त्न | ■ | रा | ज | धा | नी | ■ | स | ल | ■ | जी | व | ■ | बे |
| न | मा | ज | ■ | न्म | ■ | ल | ग्न | ■ | का | ■ | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | ■ | ना | म | ■ | भी | ■ | अ | ■ | पा | ■ | ■ |
| ली | ■ | त | ग | म | ग | ■ | स | म | ज | दा | र | ■ | शो | ध |

## विशेष



## लालपरीतून आता AI शिक्षणाचा गजर; MS-CIT सोबत नवी दिशा - प्रशांत जालनापूरकर

**➤कन्नड / प्रतिनिधी :** आधुनिक युगात आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) चा वापर झपाट्याने वाढत असून, शिक्षण क्षेत्रातही त्याचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. याच पार्श्वभूमीवर महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (MKCL) तर्फे MS-CIT कोर्ससोबत आता AI टूल्सचे शिक्षण देण्याचा महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत ही नवी शैक्षणिक संकल्पना पोहोचवण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाच्या 'लालपरी' बसचा प्रभावी वापर करण्यात येत आहे. बसवर MS-CIT सोबत AI शिक्षणाचे फलक गावांच्या नावासह लावण्यात आले असून, या माध्यमातून गावोगावी AI शिक्षणाचा संदेश पोहोचत आहे, असे मत कन्नड येथील MS-CIT केंद्राचे संचालक प्रशांत जालनापूरकर यांनी व्यक्त केले.

या उपक्रमाच्या अनुषंगाने कन्नड बस आगारात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना जालनापूरकर यांनी ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी ही संधी अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे सांगितले. आगार व्यवस्थापक स्वाती बाखडे यांनी सांगितले की, या मार्गफलकांच्या माध्यमातून प्रवाशांना महाराष्ट्र शासनाच्या MS-CIT अंतर्गत विविध अभ्यासक्रम व उपक्रमांची माहिती सहज मिळणार आहे.
या कार्यक्रमास बसस्थानक प्रमुख संघर्ष पगारे, सहायक कार्यशाळा अधीक्षक बालाजी तोटावाड, वाहतूक निरीक्षक सागर पाटील, शिफ्ट प्रमुख गणेश छत्रे यांच्यासह कन्नड शहरातील MS-CIT केंद्रांचे संचालक प्रशांत जालनापूरकर (कॉमटेक कॉम्प्युटर्स), अर्जुन दळवी (बिट कॉम्प्युटर्स), निसार मन्सूरी (शिवाजी कॉम्प्युटर्स), रामेश्वर मोरे (आरंभ कॉम्प्युटर्स) तसेच आगारातील चालक व वाहक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पोहरागड येथे ऐतिहासिक बंजारा जनजागृती मेळावा

## हेलिकॉप्टर्स ने होणार पुष्पवृष्टी : विष्णु राठोड

**➤गेवराई / प्रतिनिधि** महाराष्ट्रासह देशातील विविध राज्यांतून लाखोंच्या संख्येने बंजारा बांधव उपस्थित राहणार असल्याने हा मेळावा ऐतिहासिक ठरणार आहे. समाजाच्या एकजुटीचा संदेश देणाऱ्या या भव्य सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी सर्व भटक्या-विमुक्त बंजारा समाजाने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन विष्णु राठोड यांनी केले आहे.



बंजारा काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पवित्र तीर्थक्षेत्र पोहरागड येथे यंदा चैत्र नवरात्री निमित्त दुहेरी ऐतिहासिक सोहळा पार पडणार असून अखिल भारतीय बंजारा जनजागृती मेळावा आणि माताजी मंदिरावर प्रथमच हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी असा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर समाज बांधवांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन बंजारा ब्रिगेडचे प्रदेश संघटक अर्जुन नायक यांनी पण केले आहे.

बंजारा ब्रिगेडच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्यास देशभरातील संत-महंत व बंजारा समाजातील प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत. आमदार धर्मगुरू बाबूसिंगजी महाराज, अनंत कबीरदास महाराज, महंत सुनील महाराज, महंत जितेंद्र महाराज, महंत शेखर महाराज, महंत यशवंत महाराज, महंत रमेश महाराज, महंत खुशाल महाराज, महंत प्रकाश महाराज यांच्यासह अनेक मान्यवर या मेळाव्यात मार्गदर्शन करणार आहेत. दरम्यान, बंजारा ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष रविकांत राठोड यांच्या पुढाकारातून पोहरागडावरील पवित्र माताजी मंदिरावर इतिहासात पहिल्यांदाच हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी केली जाणार आहे. सकाळी ९ वाजता होणाऱ्या या सोहळ्यासाठी सुमारे १५ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असून, या उपक्रमामुळे संपूर्ण बंजारा समाजात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.
दरवर्षी लाखो भाविक माता जगदंबा, संत सेवालाल महाराज व रामराव बापू यांच्या दर्शनासाठी पोहरागड येथे येतात. मात्र यंदाचा सोहळा विशेष ठरणार असून धार्मिक आणि सामाजिक एकजुटीचा अनोखा संगम या निमित्ताने पाहायला मिळणार आहे.

याच दिवशी पोहरादेवी येथे सायंकाळी ५ वाजता बामणगाव रोडवरील महाराज मंदिर मैदानात अखिल भारतीय बंजारा समाज जनजागृती मेळावा पार पडणार आहे. या मेळाव्यात समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व सांस्कृतिक प्रश्नांवर चर्चा होणार असून विशेषत: एसटी आरक्षणासह विविध महत्त्वाच्या विषयांवर दिशा ठरवली जाणार आहे.

## 26 रोजी नाकलगांव येथे अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

● पान १ वरून . . . पोहोचवण्याचे कार्य करीत आहे. "बुडते हे जन न देखवे डोळा येतसे कळवळा म्हणोनिया" हीच संताची जगण्याची रीत अनेक कीर्तनातून महाराज मंडळी मांडत होते. अखंड हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून गावाने समाजाला एक सकारात्मक दिशा दिली असून, "नामस्मरणातूनच समाधान" हा संदेश पुन्हा एकदा अधोरेखित केला आहे. या भक्तिमय सोहळ्यामुळे नाकलगांवची ओळख एक आदर्श वारकरी गाव म्हणून अधिक दृढ झाली आहे.

# कृषिचे तंत्रज्ञान शेतक-यांपर्यंत पोहोचवण्यासाठी रासेयो स्वयंसेवकांनी कटीबद्ध असावे

## डॉ.अनिलकुमार भिकाने : राष्ट्रीय सेवा योजना निवासी विशेष शिबिरचा समारोप

### ➤ ग्रामविकास हाच राष्ट्रविकास होय - डॉ. बाबासाहेब ठोंबरे

**➤वडवणी / प्रतिनिधी :** प्रतिनिधी युवा मनाची योग्य वेळी, योग्य विचारांनी, उचित संस्कारांनी केलेली मशागत हीच राष्ट्र प्रगत करण्यास कारणीभूत ठरते. हि मशागत करून त्यांच्या मनातील उद्याच्या भारताचे चित्र जाणून घेण्यासाठी, त्यांचे कुटुंब, समाज याबद्दलचे विचार ऐकण्यासाठी, तसेच त्यांना दिसणाऱ्या विविध विषयांबाबत त्यांचे मत व्यक्त करण्यासाठी कृषि महाविद्यालय, लातूर मार्फत राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष निवासी शिबिर दि:१२ मार्च ते १८ मार्च २०२६ या कालावधीत मौजे दर्जी बोरगाव येथे आयोजित करण्यात आले. या कालावधीत एकूण ६० विद्यार्थी,




विद्यार्थीनींनी सहभाग घेतला आणि राष्ट्रीय सेवा योजना म्हणजे काय, तेथे कसे काम चालते, युवककेंद्रित ध्येय-धोरणे कशी असतात आणि ती कशी ठरवली पाहिजे हे सर्व त्यांनी जाणून घेण्याचा प्रयत्न केला. या सात दिवसात त्यांनी नियमितपणे योगासन वर्गास हजेरी लावून आरोग्याचे, नियमित परिसर स्वच्छता करून संत गाडगेबाबा यांच्या ग्रामस्वच्छतेचे तर महत्व समजून घेतले. या कालावधीत विद्यार्थ्यांनी महिला मेळावा, शेतीपूरक व्यवसाय, जलसंस्कार वृक्षसंवर्धन व मतदार जागृती अभियान, ग्रामीण कृषि कवी संमेलन, शेतकरी मेळावा, माध्यम :युवक – युवती सुसंवाद, व्यसनमुक्ती अभियान, रक्तदान शिबीर, पशुरोग निदान व उपचार शिबीर या विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. ज्यातून त्यांना अनेक विद्वानांचे विचार ऐकण्यास मिळाले. ज्यातून मिळालेल्या विचारांची शिदोरी आणि त्याप्रमाने केलेल्या आचाराचे महत्व कायम जीवनात उपयोगी पडेल हि भावना अनेक स्वयंसेवकांनी व्यक्त केली. दि:१८/०३/२०२६ रोजी निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून कृषि महाविद्यालय अधिष्ठाता डॉ.बाबासाहेब ठोंबरे, मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूरचे माजी संचालक विस्तार शिक्षण, डॉ.अनिलकुमार भिकाने उद्घाटक म्हणून माणुस प्रतिष्ठानचे श्री.शरद झरे, प्रमुख अतिथी डॉ.व्यंकट जगताप, श्री.अनिल माने, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ अनिलकुमार कांबळे, मुख्याध्यापक श्री.परमेश्वर बालकुंदे, माजी मुख्याध्यापक श्री.बालासाहेब यादव चिन्मयानंद ● पान ३ वर . . .

## नगराध्यक्षा गीताभाभी पवार यांच्या हस्ते 'आर्ट ऑफ फन' अकॅडमीचा बक्षीस वितरण सोहळा संपन्न





**➤गेवराई / प्रतिनिधी :** गेल्या पाच वर्षांपासून गेवराईच्या सांस्कृतिक क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केलेल्या आर्ट ऑफ फन अकॅडमीचा बक्षीस वितरण सोहळा गेवराई नगरीच्या प्रथम नागरिक नगराध्यक्षा सौ.गीताभाभी बाळराजे दादा पवार यांच्या हस्ते शनिवार दिनांक २१ मार्च रोजी उत्साहात संपन्न झाला.

गेल्या पाच वर्षांपासून गेवराईच्या थंडावलेल्या सांस्कृतिक परंपरेला नवसंजीवनी देणाऱ्या आर्ट ऑफ फन अकॅडमीचा सन २०२५ - २०२६ चा नृत्य तथा नाट्य विभागातील बक्षीस वितरण सोहळा नगराध्यक्षासौ.गीताभाभी पवार व ज्येष्ठ पत्रकार सुभाष सुतार यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाला. कलेला वय नसतं म्हणून आर्ट ऑफ फन च्या प्रत्येक उपक्रमात पवार परिवार सदैव पाठीशी असल्याचे गीताभाभी बाळराजे दादा पवारयांनी सांगितले. पत्रकार सुभाष सुतार यांनी आपल्या भाषणात
कला मानवाला समृद्ध करते .आर्ट ऑफ फन अकॅडमीचा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे असे प्रतिपादन केले .आर्ट ऑफ फन अकॅडमीमुळे मुलांमध्ये बदल जाणवला -अशी प्रतिक्रिया पालक प्रतिनिधी मुस्कान वाधवाणी यांनी दिली .या सोहळ्यात जागतिक रंगमंचावर सादर झालेले चौथे विश्व मराठी संमेलन, (नाशिक), राज्यस्तरीय अतुल परचुरे बाल कला करंडक बालनाट्य स्पर्धा (पुणे), राज्य बालनाट्य स्पर्धा (बीड), जल्लोष लोककलेचा स्पर्धा (मुंबई), इतिहास महाराष्ट्राचा स्पर्धा (मुंबई) व रंगोत्सव स्पर्धा (गेवराई) यातील ज्ञानदा जोशी, अथश्री देशपांडे, आद्या बोर्डे, आर्या वावरे, मन्नत वादवणी, प्रांजल टाक, पल्लवी उघडे, काव्या मुंदडा, अन्वी मुंदडा, अवनी खेत्रे, केतकी कवडे, कृष्णली कवडे, स्वरा झेंडेकर, विदिशा जाधव, ऋताक्षी मगर, तन्मयी घाडगे, आरोही वाघमारे, वेदांत दहिवाळ, श्लोक मानधने, वेदांत कोकाटे, श्लोक गायकवाड, अजित सदाफुले, आयुष कांडेकर, सिद्धांत निकम या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून बालरंगभूमी परिषदेचे जिल्हा समन्वयक शाहीर विलास बापू सोनवणे, इको इम्पॅक्ट फाउंडेशनचे संस्थापक रोहन पंडित, पालक प्रतिनिधी ज्योती निकम व मोठ्या संख्येने विद्यार्थी पालक उपस्थित होते.
या कार्यक्रमात सूत्रसंचालन सौ.मनिषा मानधने, प्रस्तावना रोहित पुराणिक, व आभार राम जोशी यांनी मानले .हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आर्ट ऑफ फन अकॅडमीचे संचालक शिवकुमार सोनवणे, रोहित पुराणिक, विवेक शर्मा यांनी विशेष प्रयत्न केले.

## स्वाभिमानी पत्रकार संघाची नवीन कार्यकारिणी जाहीर; सिरसाळा येथे नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा गौरव



**➤ सिरसाळा/प्रतिनिधी :** येथील सम्राट अशोक बुद्ध विहार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या वतीने शहीद भगतसिंग यांच्या शहीद दिनानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. याच कार्यक्रमाचे औचित्य साधून स्वाभिमानी पत्रकार संघाची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून, नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा जयंती समितीच्या वतीने जंगी सत्कार करण्यात आला .कार्यक्रमाच्या सुरुवातीला क्रांतीकारक शहीद भगतसिंग यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर स्वाभिमानी पत्रकार संघाच्या निवडीबद्दल उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला .या सोहळ्यासाठी बीड जिल्ह्याची बुलंद तोफ म्हणून ओळखले जाणारे माजी सरपंच रामदादा किरवले, सुभाष जिजा चोपडे, जयंती कमिटीचे अध्यक्ष अमोल भैया किरवले, उपाध्यक्ष प्रकाश उजगरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना रामदादा किरवले यांनी पत्रकारांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले आणि नवनियुक्त कार्यकारिणीला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या गौरव सोहळ्यास जयंती कमिटीचे सचिव भैया कांबळे, अशोक गावडे, उमेश भैया किरवले, सिद्धार्थ किरवले यांच्यासह बुद्ध विहार समितीचे पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वाभिमानी पत्रकार संघाच्या या नवीन निवडीबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## जिजामाता कॉलेज ऑफ नर्सिंगचा 100% निकाल; पहिली बॅच रुग्णसेवेसाठी सज्ज

**➤माजलगाव : प्रतिनिधी** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या वतीने जाहीर झालेल्या पोस्ट बेसिक बीएससी नर्सिंग अंतिम वर्षाच्या परीक्षेत माजलगाव विकास प्रतिष्ठान संचलित जिजामाता कॉलेज ऑफ नर्सिंग, माजलगाव येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत महाविद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला आहे. विशेष म्हणजे, महाविद्यालयाच्या पहिल्याच बॅचने हे यश मिळवले असून परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

महाविद्यालयातील अंतिम वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांनी परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण होत आपले शैक्षणिक प्रशिक्षण पूर्ण केले आहे. त्यामुळे हे विद्यार्थी आता समाजातील रुग्णांच्या सेवेसाठी सज्ज झाले आहेत. ग्रामीण भागात दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या या महाविद्यालयासाठी



हे यश महत्त्वपूर्ण मानले जात आहे.

या यशानिमित्त महाविद्यालयात उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच त्यांच्या पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या यशामागे प्राध्यापकांचे मार्गदर्शन, शिस्तबद्ध शैक्षणिक वातावरण आणि विद्यार्थ्यांची मेहनत कारणीभूत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

संस्थेच्या अध्यक्षा मंगलाताई प्रकाश सोळंके यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन करत आरोग्यसेवा क्षेत्रात संवेदनशीलता, कौशल्य आणि समर्पणाने कार्य करण्याचे आवाहन केले.

या यशामुळे जिजामाता कॉलेज ऑफ नर्सिंगचे नाव माजलगाव शहरासह बीड जिल्ह्यात उज्ज्वल झाले असून, पुढील काळातही गुणवत्तापूर्ण शिक्षण देत कुशल नर्सिंग कर्मचारी घडविण्याचा संस्थेचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य विनोथ कुमार, उपप्राचार्य प्रवीण कुमार, कार्यालय अधीक्षक वाघ, शिंदे, इरफान पठाण यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सर्वांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### महत्वाचे ठळक मुद्दे

● जिजामाता कॉलेज ऑफ नर्सिंगचा १०० टक्के निकाल ● पोस्ट बेसिक बीएससी नर्सिंग अंतिम वर्षाचा निकाल जाहीर ● महाविद्यालयाच्या पहिल्याच बॅचचे उल्लेखनीय यश ● ग्रामीण आरोग्यसेवेसाठी प्रशिक्षित नर्सेस तयार ● यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार व मार्गदर्शन कार्यक्रम ● संस्थेकडून गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा संकल्प पुनरुच्चारित

**हृदयस्पर्शी सोहळा** ➤ "विखुरलेली पाखरे पुन्हा एकदा आपल्या घरट्याकडे परतली..."

# सिंदफणा आश्रमशाळेत 'आठवणींचा मळा'; २००६-२०१० बॅचचा भावनिक स्नेहमेळावा उत्साहात

**➤शिरूर कासार : प्रतिनिधी** "विखुरलेली पाखरे पुन्हा एकदा आपल्या घरट्याकडे परतली" या भावनेचा प्रत्यय देणारा एक हृदयस्पर्शी सोहळा सिंदफणा आश्रमशाळेत शनिवारी (दि. २१ मार्च) पार पडला. २००६ आणि २०१० या दहावीच्या बॅचमधील माजी विद्यार्थ्यांचा संयुक्त स्नेहमेळावा मोठ्या उत्साहात आणि भावनिक वातावरणात संपन्न झाला.

सकाळी १० वाजल्यापासूनच शाळेचे प्रांगण माजी विद्यार्थ्यांच्या उपस्थितीने गजबजून गेले होते. एकेकाळी खोडकर वाटणारी मुले आज विविध क्षेत्रांत कार्यरत, सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व म्हणून शाळेत परतल्याचे पाहून शिक्षकांच्या डोळ्यांत आनंद आणि अभिमान दिसून आला. ढोल-ताशांच्या गजरात आणि गुलाबपुष्प देऊन माजी विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे सचिव राजकुमार पालवे यांनी भूषवले. यावेळी





प्राथमिक मुख्याध्यापक किशोर गुंड, माध्यमिक मुख्याध्यापक गहिनीनाथ खरमाटे, तसेच विजय आंधळे, महादेव कातखडे, किशोर खरमाटे, गणेश जायभाये, कल्याण सोनवणे, रमेश जायभाये, कचरू नेटके, वसतिगृह अधीक्षक अशोक काटे व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि राष्ट्रगीताने झाली. माजी विद्यार्थ्यांनी गुरुजनांचा फेटा, शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान केला. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य (पॅड) वाटप करून सामाजिक बांधिलकी जपली.

परिचय सत्रात अनेक विद्यार्थी भावूक झाले. "शाळेने दिलेली शिस्त आणि संस्कारांमुळेच आज आम्ही उभे आहोत," अशा भावना व्यक्त करत त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. या शाळेतील अनेक विद्यार्थी आज शासकीय सेवेत उच्च पदांवर कार्यरत असून काहीजण यशस्वी उद्योजक म्हणून नावारूपास आले आहेत.

औपचारिक कार्यक्रमानंतर माजी विद्यार्थ्यांनी जुन्या वर्गात जाऊन आठवणींना उजाळा दिला. शिक्षकांनी खो-खो, कबड्डी, संगीत खुर्ची आणि रुमाल पकडणे यांसारखे खेळ आयोजित केले होते. या खेळांमध्ये सहभागी होताना सर्वजण पुन्हा एकदा बालपणात रमल्याचे चित्र पाहायला मिळाले. या क्षणांचे रिल्स आणि छायाचित्रे टिपण्यातही उत्साह दिसून आला.

माजी विद्यार्थ्यांनी स्वखर्चातून सर्वांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन केले होते. सकाळी सुरू झालेला हा कार्यक्रम सायंकाळी ५ वाजेपर्यंत रंगला. निरोपाच्या वेळी मात्र वातावरण भावूक झाले. "शाळा सुटली तरी आठवणींची पाटी कधीच पुसली जाणार नाही," असा निर्धार व्यक्त करत माजी विद्यार्थ्यांनी शाळेला निरोप दिला. हा स्नेहमेळावा बॅच २००६ आणि २०१० च्या स्थानिक माजी विद्यार्थ्यांनी आयोजित केला होता.

### महत्वाचे ठळक मुद्दे

● २००६ व २०१० च्या दहावी बॅचचा संयुक्त स्नेहमेळावा
● माजी विद्यार्थ्यांचे ढोल-ताशांसह भव्य स्वागत ● गुरुजनांचा फेटा, शाल व स्मृतिचिन्हांनी सन्मान
● विद्यार्थ्यांकडून शाळेला शैक्षणिक साहित्य वाटप
● खेळ, रिल्स आणि जुन्या आठवणींना उजाळा
● स्नेहभोजन व भावनिक निरोपाने कार्यक्रमाची सांगता